
वेंधळा घोडेस्वार

लेखिका: **जीन बेथेल**

चित्रे व सजावट: **शेल व जॅन हेबर**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**




वेंधळा घोडेस्वार

लेखिका: **जीन बेथेल**

चित्रे व सजावट: **शेल व जॅन हेबर**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**






एक होता घोडेस्वार.

त्याचं नाव होतं क्लाईड.





त्याला घोडेस्वार असणं खूप आवडत असे.

पण त्यात एक अडचण होती.

घोड्यावर बसून राहणं

त्याला जमायला हवं होतं.

घोडा पळू लागला,

की क्लाईड असा पडत असे.

घोडा चालू लागला,

की तो असा पडत असे.





घोडा थांबला,

की तो असा पडत असे.



एकदा तर घोडा

स्वस्थ उभा असताना

तो असा पडला!

सगळेजण त्याला

वेंधळा क्लाईड म्हणत असत.



ते ऐकून क्लाईडला फार वाईट वाटे.

क्लाईडने विचार केला,

घोड्यावरून न पडण्याचा काहीतरी मार्ग असणार!



“कदाचित याचा उपयोग होईल.”





“चल घोड्या, चल,” तो म्हणाला.

आणि त्याचा घोडा पळू लागला.



पण तरीही क्लाईड पडला.





घोड्यावर चिकटून राहण्याचा

काहीतरी मार्ग असलाच पाहिजे. क्लाईडने विचार केला.

“कदाचित याचा उपयोग होईल.”

“चल घोड्या, चल,” तो म्हणाला.

आणि घोडा पळू लागला.





क्लाईड तरीही खाली पडलाच.



“अरे बापरे!” क्लाईड म्हणाला.

“मला घोड्यावरून शहरात जाता येणार नाही.

मला आता चालतच जावं लागेल.”



त्याचा एक पाय एकीकडे गेला.

आणि दुसरा दुसरीकडे.

वेंधळ्या क्लाईडला

सगळेच हसू लागले.



“अरे बापरे!” क्लाईडने विचार केला.

“मला घोड्यावरून जाता येत नाही,

आणि चालतही जाता येत नाही.

मग आता गावात जाऊ तरी कसा?”

तेवढ्यात कसला तरी आवाज झाला

“थड!”





ती होती डेझी.

डेझी नावाची गुबगुबीत गाय.



क्लाईडने डेझीकडे पाहिले.

त्याला ती आवडली.





डेझीने पण क्लाईडकडे पाहिले.


तिलाही तो आवडला.

“माझ्यासाठी हीच छान आहे.”

क्लाईड म्हणाला.

“मी हिच्यावरून पडणार नाही.”






मग ते दोघे शहरात गेले.



क्लाईड आता खुश होता.

“हे पहा!” तो म्हणाला.

“मला हिच्यावर बसून जाता येते!”



क्लाईड रोज डेझीवर बसून


गावात फिरू लागला.



कधीकधी ते क्लाईडला

जिथे जायचे असेल

तिथे जात.



कधीकधी ते डेझीला जायचे असेल

तिकडे जात.



कधीकधी ते कुठेच

जायचे नाहीत!



ते इतके मजेशीर दिसायचे,

की सगळे त्यांना पाहून हसायचे.

पण क्लाईड खुश होता.

आणि डेझी पण आनंदात होती.





एक दिवस दोन माणसे गावात आली.

त्यांच्याकडे मोठ्या बंदुका होत्या.





ते बँकेत गेले.

“हात वर करा!” ते ओरडले.





बँकेतल्या सगळ्यांनी

त्यांच्या हातातल्या बंदुका पाहिल्या.

सगळ्यांनी हात वर केले.

त्या दोन माणसांनी

बँकेतले सगळे पैसे घेतले.

आणि ते दारातून बाहेर पडले.



आणि तेवढ्यात वेंधळा क्लाईड

आणि डेझी तिथे आले.

त्यांना ती दोन माणसे दिसली.

“डेझी, थांब!” क्लाईड म्हणाला.

“आता आपण काहीतरी केलं पाहिजे!”





डेझी थांबली.

त्या माणसांना ती दिसलीच नाही.

त्यांच्यावर काहीतरी पाठीमागून आपटले.

तिची शिंगे म्हणजे बंदुका आहेत असेच त्यांना वाटले.



“हात वर!” क्लाईड म्हणाला.

“बंदुका खाली टाका!”

ती माणसे जागच्या जागी उभी राहिली.

त्यांनी हात वर केले.

बंदुका खाली टाकल्या.




आणि अशा तऱ्हेने

डेझीने त्या माणसांना उचलले!

“चल डेझी,” क्लाईड म्हणाला.

“आपण आता पोलिसांकडे जाऊया.”





गावातले सगळे लोक

वेंधळ्या क्लाईडला आणि त्या माणसांना


पहायला रस्त्यावर आले.

आता कोणीच हसले नाही.



क्लाईड त्यांना घेऊन पोलीस चौकीत गेला.

त्या लोकांना शेरिफच्या ताब्यात दिले.



सगळे पैसे

त्याने बँकेच्या प्रमुखाला परत दिले.



“शाबास क्लाईड!
धन्यवाद!”

शेरीफ म्हणाले.



“धन्यवाद, क्लाईड,”

बँकेचे प्रमुख म्हणाले.

“शाबास, क्लाईड,”

सगळे म्हणाले.





“माझे नका आभार मानू,” क्लाईड म्हणाला.

“खरे आभार तर डेझीचे मानायला हवेत.”



“शाबास! गाईवरच्या स्वारा!”

त्याला आता कोणीच

वेंधळा क्लाईड म्हणत नाहीत.

समाप्त